नीज ८ चाल सारी सारी रात तेरी याद सताये

निज रे, आता निज वेल्हाळा ।
झोके देते तान्ह्या बाळा ॥ धृ ॥
रंगीत पाळणा गादी शेवरीची ।
आंथरली वर चादर फुलांची
फुला पांघराया रेशमी हा शेला ॥१॥
देवरूप हे बालरूप निव, ब्रह्मानंदी खेळे जीव ।
तुला पाहुनीया जीव सुखावला ॥२॥
पाळण्यात घे झोप (झोप), सुखाने हास खेळ आणि स्वप्नं पाळ
घरी दारी आला तुझाच रे चाळा ॥३॥
बाळकडू देते शक्तीचे बुद्धीचे
भाग्यवंत बाळ स्वप्न हे उद्याचे
तुझ्या कर्तृत्वाचे भूषण आईला ॥४॥



अंगाई गीत मुलीचे

चाल - हळके हळके जोजवा बाळाच्या पाळणा

झोके देते तुला लाडके अंगाई गाते ।
छकुले तुला जोजविते धृ ॥
प्रितीलतेवर कलिका पाहिली, रंग रुपाने सुंदर नटली ।
की चंद्राची कोर चिमुकली नभांगणी खेळते ॥१॥
मातृपदाची होता प्राप्ती, स्त्री जन्माची पटत महती ।
सर्व सुखाची ती परिपूर्ती, क्षणात अनुभवते ॥२॥
तुझ्यामुळे हे शोभिवंत घर, भरले माझे चित्तसरोवर ।
उरात दाटे माया पाझर, तृप्त करीन तू ते ॥३॥
छत्र तुजवरी स्नेह प्रितीचे
अलंकार घालीन गुणांचे, बाळकडू पाजीन,
तृप्तीचे, मंगल तव चिंतीते ॥४॥

2

हलके, हलके जोजवा बाळाचा पाळणा
पाळण्याच्या मधोमध फिरतो खेळणा ।।धृ।।
सजली ग मऊ, मऊ मखमलिची शैया ।
निजली ग बाळाची, गोरी, गोरी काया ।
बाळ रूप हे देवाचे भुलविते लोचना ऽऽऽऽ
पाळण्याच्या मधोमध फिरतो खेळणा ।।१।।
गोविंद घ्या गोपाळ घ्या, घ्या ग सयानो ।
खेळवा लाडाने गोपा बाया नो
नाव ठेवा नवसाचा हा राजा देखणा ऽऽऽऽ
पाळण्याच्या मधोमध फिरतो खेळणा ।।२।।
कुर करा कानात हळूच भेटा ग,
बारशाच्या सोहळ्या घुगऱ्या वाटा ग
आज बाई इंद्राचा दरबार ठेंगणा ऽऽऽऽ
पाळण्याच्या मधोमध फिरतो खेळणा ।।३।।

७

निज माझ्या नंदलाला नंदलालारे ।।धृ।।
शांत हे आभाळ सारे, शांत तारे शांत वारे ।
ह्या झऱ्यांचा सूर आता बंद झाला बंद झाला रे ।।१।।
झोपल्या गोठ्यात गाई, चांदवा पडसाद नाही ।
पाखरांच्या गर्जना ही, बंद झाल्या बंद झाल्या रे ।।२।।
नीजरे आनंद कंदा, नीजरे माझ्या मुकुंदा ।
थांबवी हा छंद चाळा छंद चाळा रे ।।३।।

८

गोकुळ म्हणती गोकुळीला, पुत्र झाला यशोदेला ।।धृ।।
एक धावती एकी पुढे । एक धावती एकी पुढे
एक वाटती सुंठवडे । एक वाटती सुंठवडे ।।१।।
वाजे घेवूनीया ताटी । वाजे घेवूनीया ताटी
नंदाघरी झाली दाटी । नंदा घरी झाली दाटी
ऐसी गलबल झाली । ऐसी गलबल झाली
दासी जनी हेल घाली । दासी जनी हेल घाली ।।२।।

हले हा नंदा घरी पाळणा
त्यात देखणा गोजिरवाणा, हसतो गोकुळराणा
ओठ लाल हे डोळे चिमणे। हास्यातून त्या फुले
चांदणे, स्वरूप सुंदर लोभस वाणे
मोहून घेई मना ॥१॥

बोल बोबडे ते भाग्याचे, शब्द वाटती.
ते वेदांचे, रुण झुणताती घुंगरवाळे
ये धेनुना पान्हा ॥२॥

नंद यशोदा करती कौतुक, आनंदाचे
अमाप ते सुख, माता, पित्याविणा
कसे कळावे, सौख्य तयाते कुणा ॥३॥

## ३ राग दरबारी कानडा

जो, जो, जो झोका दे कौसल्या माई।
लडिवाळ बाळा करी अंगाई ॥धृ॥
विंझणा वाऱ्याला, चंदनी पंखा। माये हालवीत आई सारखा
कंकणा कुणीही नका वाजवू, होईल निद्रेला बाळ पारखा ॥१॥
नाजूक, नाजूक टाका पाऊल, राजसाला माझ्या
लागे चाहूल। पाखरांनो आता घरी परता।
चिमण्यांची झाली झोपेची वेळा ॥२॥
निद्रादेवी त्याला घेई कुशीत, लबाड हसे
तो स्वप्नी खुषीत, गीताने होईल
स्वप्नांचा भंग। थांबवते माझे
अंगाई गीत ॥३॥

निजल्या तान्ह्यावरी माऊली
दृष्टी सारखी धरीऽऽधी ॥
सटवाई जोगाई हसवीती, खळी गोडु गालावर
पडती । ज्याची स्वप्ने सुखव मधुरती ।
कौतुक ते अंतरी ॥१॥
तिच्या काळिजा पदरि निजला । जिवापाळीकडे
जपे त्याजला । कुरवाळूनि चिमण्या राजाला,
पुंबी वरचेवरी ॥२॥
आरीच असशी त्रिभुवन जनानि ।
बघत झोपल्या मजकावरुनि ।
सुखदु:खाची स्वप्ने बघुनि
कौतुक ते पाखरी ॥३॥



लिंबोणीच्या झाडामागे, चंद्र झोपला ग बाई ॥ध्रु॥
आज माझ्या पाडसाला, झोप का ग येत नाही ॥१॥
गाय झोपली गोठ्यात, घरट्यात चिऊ ताई ।
परसात वेलीवर, झोपल्या ग जाई जुई ।
मीट पापण्या डोळ्यांच्या हो हो हो
गाते तुला मी अंगाई ॥२॥
देवकी नसे मी बाळा भाग्य यशोदेचे भाळी ।
तुझे दु:ख घेण्यासाठी । केली पदराची झोळी, हो हो हो
जगा वेगळी ही ममता ।
जगा वेगळी अंगाई, हो हो हो ॥३॥